महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY &
HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE- 411 005

DIVISINAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 25536712 (OFF)

E-MAIL -
sscboardpune@gmail.com

क्र.पुविमं/यो.प्र./२०२५/ 6454
पुणे - ४११००५
दिनांक- २५/०७/२०२५

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय
पुणे/अहिल्यानगर/सोलापूर

विषय - शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून CBSE व ICSE या बोर्डाच्या विद्यार्थ्यांच्या योग्यता प्रमाणपत्र कार्यवाहीबाबत...

संदर्भ - राज्यमंडळ कार्यालय,पुणे यांचे क.रा.मं./संशोधन/२४९२ दि. १०.०७.२०२५ चे पत्र

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरून या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यता प्राप्त महाविद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य यांना कळविण्यात येते कि, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून CBSE व ICSE या बोर्डाच्या विद्यार्थ्यांच्या योग्यता प्रमाणपत्र मिळणे बाबतची कार्यवाही करतांना शिक्षण उपसंचालक कार्यालय यांचेकडून CBSE व ICSE या बोर्डाच्या विद्यार्थ्यांची इ. ११ वी व इ.१२ वी प्रवेशाबाबतची यादी राज्यमंडळ कार्यालय, पुणे, यांना प्राप्त झाल्यानंतर सदर यादी विभागीय मंडळ कार्यालयास प्राप्त होईल. सदर विद्यार्थ्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयांना योग्यता प्रमाणपत्र संदर्भात निर्धारित शुल्क रु.१,०००/- प्रति विद्यार्थी भरणा करणेबाबत कळविण्यात येईल. सदर कनिष्ठ महाविद्यालयाकडून शुल्काचा भरणा झाल्यानंतर संबधित विद्यार्थ्यांची नावे मंडळामार्फत प्रमाणित करून पत्राद्वारे कनिष्ठ महाविद्यालयांना कळविण्यात येतील.(सदर विद्यार्थ्यास वेगळे प्रमाणपत्र देण्यात येणार नाही.)

याबाबत संबधित महाविद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय यांनी नोंद घेऊन त्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून CBSE व ICSE बोर्डाच्या विद्यार्थ्यांच्या योग्यता प्रमाणपत्राबाबत कार्यवाही करण्यात यावी.

तसेच CBSE व ICSE बोर्डाव्यतिरिक्त इतर बोर्डातील/परराज्यातील/परदेशातील विद्यार्थ्यांच्या योग्यता प्रमाणपत्र अर्जाची प्रचलित पद्धतीने ऑनलाईन प्रणालीद्वारे आवेदनपत्रे, कागदपत्रे, शुल्क भरणा करून तसेच सदर विद्यार्थ्यांना ऑनलाईन योग्यता प्रमाणपत्र प्राप्त होईल.

पुढील शैक्षणीक वर्ष २०२५-२६ साठीची ऑनलाईन प्रक्रिया दिनांक १ सप्टेंबर २०२५ पासून सुरु करण्यात येणार आहे याची नोंद घेण्यात यावी.

25/7

(कैलास दातखीळ)
विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ,पुणे